**सरकारतर्फे सा.क्र.१**

**शपथेवर**

नांव : शिवाजी सारंधर घुले,
वय : ३४ वर्षे , धंदा : नोकरी,
राहणार : सांगवी शिवार, म्हाळसपिंपळगाव,
ता.- नेवासा, जि. अहमदनगर

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** -

१. आरोपी क्र.१ विक्रम रंधे हे माझे सासरे आहेत, आरोपी क्र. २ सोनाली घुले ही माझी पत्नी आहे आणि आरोपी क्र. ३ ते ६ या माझ्या मेहुण्या आहेत. घटना दि. १४/११/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता माझ्या घरासमोर सांगवी येथे घडली होती. त्या दिवशी मी घरी असताना आरोपी क्र. १, ३ ते ६ हे सर्व जण माझ्या घरी आले व माझ्या पत्नीला सारखा का त्रास देता, मारहाण का करता याबाबत मला विचारणा केली. त्यावर मी त्यांना सांगितले की, माझी पत्नी ही सतत फोनवर बोलत असते व घरातील काही काम करीत नाही हे सांगत असताना संगिता व अश्विनी यांनी मला शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. अश्विनी व सोनालीने माझ्या उजव्या हातावर व पाठीवर विट आणि काठीने मारहाण केली. त्यानंतर मेहुणी मंदा कोरडे, अर्चना टेमकरे आणि संगिता मोकाटे यांनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर माझा भाउ नामे भाउसाहेब हा वाद सोडवण्यासाठी आला असता त्याला संगिता आणि मंदा यांनी तोडांवर आणि डोक्यावर विटेने आणि काठीने मारहाण केली. त्यानंतर मी शिंगणापुर पोलिस ठाण्यात आरोपींविरूद्ध फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच फिर्याद असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४८** देण्यात येते. आरोपींनी मला व माझ्या भावाला मारहाण केल्यानंतर तपासाकरीता मी व माझा भाउ नेवासा ग्रामीण रूग्णालयात गेलो. आम्ही दोघांनीही ग्रामीण रूग्णालयात उपचार घेतले. ज्या काठीने व विटेने मला व माझ्या भावाला मारहाण झाली ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला पी. आर. नं. २७/२५ वरील काठी दाखविण्यात आली. ती तिच काठी आहे ज्याने मला व माझ्या भावाला मारहाण झाली. त्या काठीस मटेरिअल ऑब्जेक्ट क्र. १ असे देण्यात येते. आता मला विटेचा तुकडा दाखविण्यात आला ज्याने मला व माझ्या भावाला मारहाण झाली. त्या विटेस मटेरिअल ऑब्जेक्ट क्र. २ असे देण्यात येते. आज रोजी सर्व आरोपी न्यायालयात उपस्थित आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. आर. बी. गव्हाणे यांचे मार्फत उलटतपास सुरू.</u>**

**प्रश्न:** घटनेच्यावेळी तुम्ही, पत्नी, आई-वडील व भाउ एकत्र राहत होते ?

**उत्तर:** मी व माझी पत्नी, आई-वडील व भाउ वेगळे राहत होतो.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सास-यांचा एक हात तुटलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मेहुण्या काही जणी तालुक्याच्या बाहेर व काही जणी तालुक्यात त्यांच्या सासरी नांदतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझ्या पत्नीचे नेहमी किरकोळ वाद होत होते. हे म्हणणे खरे आहे की, मला दोन मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला मुलगा व्हावा ही इच्छा होती. घटनेच्या वेळी सचिन देसरडा यांच्याकडे सेल्समनच्या कामाला होतो. हे म्हणणे खरे आहे की, सचिन देसरडा हे तालुक्यातील राजकीय पुढारी आहेत. साक्षीदार स्वत :हुन सांगतात की, ते बी.जे.पी. चे उपाध्यक्ष होते. त्यांचा प्रशासनावर चांगला दबदबा आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मुलगा नसल्यामुळे मी, माझे आई-वडील व भाउ माझ्या पत्नीसोबत कायम वाद घालत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कधी-कधी दारू पिवुन पत्नीला मारहाण करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, घ टनेच्या दोन दिवस अगोदर माझ्यात व माझ्या पत्नीमध्ये वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी माझे सासरे व ब-हाणपुरचा पत्नीचा मावसभाउ मला समजुन सांगण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी पत्नीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.१२/११/२०२२ रोजी माझ्या पत्नीने माझ्याविरूद्ध शिंगणापुर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. माझ्या पत्नीसोबत माझे सासरे तक्रार देण्यासाठी गेले होते किंवा कसे ? हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिस ठाण्यामधुन फोन आल्यामुळे मी तेथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी फिर्याद देण्यासाठी पोलिस ठाण्याला आल्यामुळे मी माझे मालक देसरडा यांना फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांचे व देसारडेंचे त्यावेळी बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, देसारडेंनी पोलिसांना सांगितले होते की फिर्याद दाखल करून घेवु नका. हे म्हणणे खरे नाही की, देसारडेंच्या दबावामुळे पोलिसांनी माझ्या पत्नीच्या तक्रारीवरून केवळ अदखपात्र गुन्हा दाखल करून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही मुली माझ्या पत्नीकडेच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीला भाउ नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना दिवाळी नंतर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवाळी साठी मी मालकाकडुन ३४ हजार रूपयांची उचल घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की,

त्यानंतर मी चार-पाच दिवस घरीच गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा मी घरी गेलो तेव्हा माझे सगळे पैसे संपले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने पैशाबाबत विचारण केल्यामुळे मी तिला मारहाण करून रात्रभर घराबाहेर उभे केले. हे म्हणणे खरे आहे की, अदखलपात्र गुन्हा दाखल झाल्यापासुन माझी पत्नी माहेरीच राहत आहे व पुन्हा घरी आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मालकांना घेवुन शनिशिंगणापुर पोलिस ठाण्यात जावुन आरोपींविरूद्ध खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझ्या मेहुण्या घरी आल्या नव्हत्या तसेच माझे सासरे व पत्नी त्या दिवशी घरी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मेहुण्यांनी मला लाथाबुक्क्यांनी व विटेने मारले हे मी खोटे सांगत आहे. संगिताने मला डोक्यावर, तोडांवर काठीने मारले होते हे मी पोलिसांना सांगितले होते ते माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा माझे सासरे मला समजुन सांगण्यासाठी आले होते तेव्हा मी त्यांना म्हटलो होतो की, मला पत्नीला नांदवयाचे नाही, घटस्फोट घ्यायचा आहे व दुसरे लग्न करायचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने मला घटस्फोट द्यावा तसेच माझ्यावर पोटगीची केस दाखल करून नये याकरीता मी पत्नी, सासरे व मेहुण्यांवर खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. मटेरिअल ऑब्जेक्ट क्रमांक १ वरील काठी साधारण: तीन फुट लांबीची असेल या प्रश्नावर साक्षीदार ब-याच वेळ शांत होता व त्याने त्या प्रश्नावर उत्तर दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, काठी व विटकर ही मी घरातुन पोलिसांनी काढुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, दि१४/११/२०२२ रोजी कोणतीच घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मालकाचा राजकीय दबाव वापरून मी आरोपींविरूद्ध खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
**स्वाक्षरीत/-**
(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ४, नेवासा.

दिनांक :०२/०८/२०२५.